# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता.१५/१०/२०२०**

## व्हॉट्सअप ग्रृपवर मटका जुगार चालविणारी टोळी जेरबंद, ६५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांनी शहरातील अवैद्य धंदे रोखण्यासाठी मोहीम उघडली असुन त्या अनुशंगाने दि.१३/१०/२०२० रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे आदेशानुसार सपोनि गणेश पाटील तसेच पोलीस कर्मचारी गणेश सावंत, नितीन खेसे, विशाल भोईर असे पथक अवैध धंदयांना आळा बसावा या दृष्टीने भोसरी व एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना **पोलीस शिपाई गणेश सावंत** यांना माहिती मिळाली की, शांतीनगर, भोसरी येथील हॉटेल मयुरेशचे मालक इद्रजीत भोईर हा त्याचे मोबाईलवरून व्हॉट्सअपचे माध्यमातुन मटका घेत आहे. असे मिळाले माहितीवरून वपोनि उत्तम तांगडे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली वरील पथकाने हॉटेल मयुरेश येथे छापा टाकुन **१) इंद्रजीत जर्नाधन भोईर, वय ३२ वर्षे, रा. सावंतनगर, आळंदी रोड, पुणे २) पवन चुडामन ठोकर, वय ४० वर्षे, रा. बौध्दनगर, पिंपरी पुणे, ३) स्वप्नील रामेश्वर कदम, वय २१ वर्षे, रा. काळेवाडी, पुणे** यांना वेगवेगळ्या ठिकाणी पकडण्यात आले. त्यांचे मोबाईल चेक केले असता ते तिघेही आप आपले मोबाईल वरून व्हॉट्सअप ग्रृप तयार करून त्यावर ओळखिचे लोकांकडुन मटका जुगार घेत असल्याचे उडघ झाले. त्यांचेकडून **३३,५००/- रू रोख रक्कम, ३ मोबाईल व हिशोबाच्या वह्या असा ६५ हजाराचा मुद्देमाल** हस्तगत करून त्यांचे विरूध्द व त्याचे आणखी तीन साथीदार यांच्या विरूध्द मुंबई जुगार ॲक्ट नुसार भोसरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हे वेगवेगळ्या भागामध्ये राहणेस असुन त्यांनी आपआपल्या मोबाईलवर प्रत्येकाचे स्वतंत्र व्हॉट्सअप ग्रृप तयार करून त्यामध्ये ओळखिले लोकांला समाविष्ठ करून त्यामार्फत मटका जुगार घेतात तसेस घेतलेला जुगाराचे हुशोबाचा स्वतंत्र ग्रृप असल्याचे उघड झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुधिर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस कर्मचारी गणेश सावंत, नितीन खेसे, विशाल भोईर यांचे पथकाने केली आहे.